# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-३६२०/प्र.क्र.४०/फ-१०
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१.०१.२०२१

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय:** भताळी ओपन कास्ट माईन या प्रकल्पाच्या विस्ताराकरीता वेस्टर्न कोलफिल्डस लि. यांना ०.२० हेक्टर झुडपी जंगल जमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-१७/NC/II/ID-१२७३६/१३७८/१८-१९, दि.२८.११.२०१९

महोदय,

विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील मुद्यांबाबत माहिती / अभिप्राय / स्पष्टीकरणात्मक खुलासा आपणाकडून प्राप्त करून घेण्याचे मला निर्देश आहेत:-

- वळतीकरणाचे क्षेत्र केवळ ०.२० हे. असले तरी प्रकल्पासाठी एकूण ८३८ हे. क्षेत्र लागणार आहे.
- चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांची संख्या पाहता, ईरई नदीच्या बाजूला हा प्रकल्प होणे वन्यजीवांच्या अधिवास व भ्रमणास धोका निर्माण करणारे आहे.
- सदर प्रकल्पाबाबत राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होणे गरजचे आहे, असे वाटते.
- सदरच्या प्रकल्पामुळे वाघ व इतर वन्यजीव प्राणी यांच्या अधिवासावर व भ्रमणमार्गावर विपरित परिणामाबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घ्यावेत.

तरी, उपरोक्त मुद्यांबाबतची माहिती शासनास सादर करावी , ही विनंती.

(सुनिल पांढरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner